**विशेष दिवाणी दावा क्र. ३६/२०२३**
**निशाणी ३८, ४० व ४५ वर संयुक्तिक आदेश**

वादीने वरील तीन अर्ज प्रतिवादी क्र.३ हिचे वारस अभिलेखावर घेणेकामी, प्रतिवादी क्र.३ च्या मृत्युमुळे झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करणेकामी व त्याकामी झालेला विलंब माफ करणेकामी दाखल दाखल केलेले आहेत.

२. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ सुमन गेणू वराडे हि दिनांक २३.०४.२०१८ रोजी मयत झाली आहे. त्यानंतर वादी कुटूंबिय दुखित होते. त्यानंतर कोरोनामुळे लॉकडाउन सुरु झाले होते, या कारणास्तव प्रतिवादी क्र. ३ चा मृत्युदाखला उपलब्ध झाला नाही. केवळ याच कारणामुळे प्रतिवादी क्र. ३ हिचे वारस अभिलेखावर घेणेकामी अर्ज दाखल करण्यास विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र. ३ हिला एकुण तीन वार आहेत. वरिल कारणामुळे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला विलंब माफ करुन प्रतिवादी क्र. ३ हिचे वारस अभिलेखावर घेण्यात यावे अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादींच्या वतीने सदरील अर्जास म्हणणे सादर करुन आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादी क्र. ३ हिच्या मृत्युचा दाखला न्यायालयात हजर नसल्याने अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. निशाणी ३६ वरिल आदेशानुसार प्रतिवादी क्र. ३ हिचे नाव कचाबाई गेणुजी वराडे ऐवजी सुमन गेणू वराडे अशी दुरुस्ती करण्यास वादीस परवानगी देण्यात आलेली आहे. वादीने निशाणी ४४ वर सौ. ज्योती मंगेश कर्पे हिचे शपथपत्र दाखल केले असुन ती प्रतिवादी क्र. ३ हिची मुलगी आहे. तिने तिच्या शपथपत्रात असे नमुद केले आहे की, तिच्या आईचे लग्नापुर्वीचे नाव कचाबाई असे होते. लग्नानंतर तिचे नाव सुमन असे झाले आहे. यादी निशाणी ४२/१ वरील मृत्युप्रमाणपत्र पाहिले असता प्रतिवादी क्र. ३ सुमन गेणू वराडे हिचा मृत्यु दिनांक २३.०४.२०१८ रोजी झाल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ११.०७.२०२४ रोजी दिला आहे. कोरोना किंवा न्यायालयीन कामकाज काही

कालावधीकरिता बंद असलेतरी न्यायालयाचे कामकाज प्रत्यक्षात सुरु झाल्यानंतर वादीने सदरील अर्ज दाखल करण्यास उशिर केलेला आहे. दाव्याचे स्वरुप तसेच अर्जातील कारण लक्षात घेता प्रतिवादी क्र. ३ हिचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ करणेबाबत आदेश पारित करणे उचित आहे. परंतु त्यासाठी झालेला उशिर लक्षात घेता उर्वरित प्रतिवादी हे खर्चाची रक्कम मिळणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी क्र. ३८, ४० व ४५ हे प्रतिवादी क्र. १ व २ यांना खर्चाची रक्कम रु. ७००/— देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत भरुन योग्य ती दुरुस्ती करावयाची आहे.

३. वादीने प्रतिवादी क्र. ३ च्या वारसास दाव्याची प्रत तसेच कागदपत्रांची प्रत सादर करावयाची आहे.

सही/—

**ठिकाण : सिन्नर**
**दिनांक : ०७.०८.२०२५**

**(आर. एस. कानडे)**
**दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,**
**सिन्नर**